**भाषा संचालनालय**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, यांचे कार्यालय,
नवीन प्रशासन भवन, १८ वा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-२६५५२१८४/०२२-२६४१७२६५ इमेल :- bhashasanchalak@yahoo.in

क्र. मभापं-२०२६/प्र.क्र.१६३/८२ /चौदा.
दिनांक :- १४/०१/२०२६.

प्रति,
श्री/श्रीमती डॉ. एकनाथ आळवेकर
**सन्माननीय मराठी भाषा बोली अभ्यासक/बोली तज्ञ.**

विषय : **मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या "बोलींचा जागर" कार्यक्रमांमध्ये आपल्याला नेमून दिलेल्या बोलींच्या संबंधात मार्गदर्शन करण्याकरिता उपस्थित राहण्याबाबत.**

**संदर्भ :** मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र. मभापं-२०२१/प्र.क्र.१३६/भाषा-२. दिनांक २२/१२/२०२१.

माननीय महोदय/महोदया,

महाराष्ट्रातील विविध बोलींचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याकरिता या वर्षाच्या **"मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या"** निमित्त महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये **"बोलींचा जागर"** हा कार्यक्रम आयोजित करण्याकरिता संबंधित विद्यापीठांशी व महाविद्यालयांशी तसेच संस्थांशी आणि बोलीभाषा अभ्यासकांशी व बोली तज्ञांशी वेळोवेळी केलेल्या चर्चेनुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये **"बोलींचा जागर"** हा कार्यक्रम निश्चित केला आहे. प्रत्येक जिल्ह्यामधील बोली बहुलक्षेत्रामध्ये एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आयोजक महाविद्यालय किंवा संस्था यांची नावे निश्चित करण्यात आलेली आहेत. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील बोलीबहुल भागाच्या ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या बोलींची निवड करण्यात आली आहे आणि त्या बोलींच्या संबंधात मार्गदर्शन करण्याकरिता, संबंधित बोली भाषा तज्ञ व अभ्यासक यांची नावे निश्चित करण्यात आलेली आहेत. त्याचा कार्यक्रम आराखडा सोबत जोडलेला आहे.

कृ.मा.प.

त्यानुसार, आपल्याला नेमून दिलेल्या आयोजक विद्यापीठामध्ये/ आयोजक महाविद्यालयामध्ये व संस्थेमध्ये **"बोलींचा जागर"** या कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे आणि आपल्याला नेमून दिलेल्या बोलींच्या संबंधात अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करावे, ही विनंती.

आपल्याला नेमून दिलेल्या बोलींचा उद्गम व विकास, तिचे स्वरूप व वैशिष्ट्ये, मराठी भाषेतील तिचे महत्त्व व भाषिक प्रभाव, तिचा विविध क्षेत्रातील वापर व सद्यःस्थिती, तिचा वापर कमी होण्याची कारणे, तिचे जतन व संवर्धन करण्याची गरज आणि त्याविषयी करावयाच्या उपायोजना, इत्यादी मुद्द्यांच्या अनुषंगाने आपण जास्तीत जास्त ३० ते ४० मिनिटे मार्गदर्शनपर भाषण करावयाचे आहे. ज्या ठिकाणीच्या कार्यक्रमामध्ये दोनपेक्षा अधिक बोली निश्चित केलेल्या असतील त्या ठिकाणी प्रत्येक बोली तज्ञाला/बोली अभ्यासकाला प्रत्येकी जास्तीत जास्त २५ ते ३० मिनिटे वेळ देण्यात येईल. या भाषणामध्ये, कोणत्याही व्यक्तीचा किंवा समाजाचा किंवा धर्माचा किंवा भाषेचा अवमान होईल किंवा शासनाविरुद्ध अपप्रचार केला जाईल अशा बाबींचा समावेश असणार नाही त्याची कृपया काळजी घ्यावी. प्रत्येक बोलीभाषा तज्ञाने किंवा बोलीभाषा अभ्यासकाने आपल्या भाषणाचा मसुदा लेखी स्वरुपात, आधीच कृती गटाच्या मुख्य समन्वयकाकडे /उप समन्वयकाकडे सादर सादर करावा, ही विनंती. यासाठी आपल्याला यथोचित मानधन देण्यात येईल. ऑनलाइन प्रणालीद्वारे मानधनाची रक्कम प्रदान करण्याकरिता, नियमानुसार आवश्यक असलेला आपला तपशील मुख्य समन्वयकाकडे /उप समन्वयकाकडे सादर करावा, ही विनंती.

आपला,

(अरुण वा. गिते)
**भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.**

**प्रत: माहितीसाठी सविनय सादर:**

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. विभाग प्रमुख, मराठी भाषा विभाग, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, संबंधित आयोजक महाविद्यालय व संस्था.
४. विभाग प्रमुख, मराठी भाषा विभाग, संबंधित आयोजक महाविद्यालय व संस्था.

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004, (MAHARASHTRA)
DEPARTMENT OF MARATHI
Office - (0231) 2609215, Head Of Department - (0231) 2609213
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर : ४१६ ००४ (महाराष्ट्र)
मराठी विभाग
कार्यालय - (०२३१) २६०९२१५, विभागप्रमुख : (०२३१) २६० ९२१३

NAAC A++
GRADE WITH
CGPA 3.52

जावक क्रमांक : शिवाजी वि/ मराठी विभाग /                                                दि. १७/०१/२०२६

प्रति,

डॉ. एकनाथ आळवेकर

कोल्हापूर.

विषय:- व्याख्यानासाठी उपस्थित राहणेबाबत...

महोदय,

बुधवार दि. २१ जानेवारी, २०२६ रोजी मराठी विभागामध्ये सकाळी ११.३० वा. महाराष्ट्र शासनाच्या दि. ०९ जानेवारी २०२६ च्या पत्रानुसार मराठी भाषेतील बोलींचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने **'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'** साजरा केला जातो. या अंतर्गत होणाऱ्या **'बोलींचा जागर'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमात आपण **'कोल्हापूरी बोली'** या विषयावर मांडणी करण्यासाठी आपणास प्रमुख वक्ते म्हणून निमंत्रित करीत आहोत. तरी आपण उपस्थित राहून आपले विचार मांडावेत अशी विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**प्रा. डॉ. रणधीर शिंदे**
प्राध्यापक व प्रमुख
मराठी विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर-४१६ ००४

https://mail.google.com/mail/u/0/#inbox?projector=1

# महाराष्ट्र राज्य भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग, मुंबई

आणि

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## मराठी विभाग

यांच्या संयुक्त विद्यमाने

आयोजित

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त**

## बोलींचा जागर

**(कोल्हापुरी आणि चंदगडी बोली)**

## कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| **प्रास्ताविक** | : **प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे** |
| **भूमिका** | : **डॉ. संजय पवार** (उपसमन्वयक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य) |
| **पाहुण्यांचा परिचय** | : |
| **स्वागत** | : |
| **मनोगत** | : **१. डॉ. एकनाथ आळवेकर**<br>**२. डॉ. नंदकुमार मोरे**<br>**३. डॉ. गोपाळ गावडे** |
| **अध्यक्ष** | : **डॉ. व्ही. एन. शिंदे** (कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) |
| **सांस्कृतिक कार्यक्रम** | : **चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण** |
| **सूत्रसंचालन** | : **प्रांजली क्षीरसागर** |
| **आभार** | : **डॉ. सुखदेव एकल** |

---

स्थळ : रामानुजन सभागृह, गणित विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दिनांक : बुधवार, २१ जानेवारी, २०२६. सकाळी १०.३०

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य

# बोलींचा जागर

# प्रमाणपत्र

श्री. / श्रीमती डॉ. एकनाथ आळवेकर, कोल्हापूरी बोली तज्ज्ञ

आपण मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, २०२६ निमित्ताने आयोजित केलेल्या 'बोलींचा जागर' या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. बोलींचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्याच्या या महत्वाकांक्षी उपक्रमातील आपल्या विशेष योगदानाबद्दल आपणास हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

**अरुण गिते**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य

**डॉ. किरण कुलकर्णी** (भा.प्र.से.)
सचिव, मराठी भाषा विभाग तथा सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र शासन

हाण,
दाखल

यांचे पाणी ारणावरून महिलेसह डी फळी करण्यात वाजीनगर द्ध गुन्हा हे. मयुर अलका (सर्व रा. ची नावे आनंदी बाई पार्क, हे.फिर्यादी माहेरी घराच्या होत्या. अलका पडत लण्यास ला. या तुटले. ारहाण यांनी र्यादीत

# बोलीभाषेचा सार्वत्रिक सन्मान होणे गरजेचे

## शिवाजी विद्यापीठातील 'बोलींचा जागर' कार्यशाळेत मान्यवरांचा सूर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

बोलीभाषा टिकविण्यासाठी त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याबरोबरच तिच्याविषयी सन्मानाची भावना निर्माण होण्याची आवश्यकता आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित 'बोलींचा जागर" या एकदिवसीय कार्यशाळेतून उमटला.

राज्य शासनाच्या भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग आणि शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याअंतर्गत आयोजित 'बोलींचा जागर कार्यशाळेत मान्यवरांनी भाषेचे विविध पैलू उलगडले. कार्यशाळेत कोल्हापुरी आणि चंदगडी बोलींच्या अनुषंगाने चर्चा आणि चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण झाले.

मराठी भाषा विभागांचे मंत्री डॉ. उदय सामंत आणि सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून आयोजित



डॉ. एकनाथ आळवेकर



डॉ. गोपाळ गावडे



नंदकुमार मोरे



डॉ. संजय पवार

या उपक्रमात डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोपाळ गावडे आणि डॉ. एकनाथ आळवेकर यांनी सहभाग दर्शविला. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. मराठी भाषा विभागाचे उपसमन्वयक डॉ. संजय पवार प्रमुख उपस्थित होते.

चंदगडी बोली : उगम आणि विकास या विषयावर बोलताना डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, बोलीभाषेचा न्यूनगंड विद्यार्थ्यांच्या मनात शालेय शिक्षणापासूनच निर्माण केला जातो. बोलीभाषा ही आपल्या अस्तित्वाचे कारण आहे, याची जाणीव नागरिकांमध्ये निर्माण होणे आवश्यक आहे.

'चंदगडी बोलीचे स्वरुप" या विषयावर बोलताना डॉ. गोपाळ गावडे म्हणाले, चंदगड हे ठिकाण महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या राज्यांच्या सीमेवर आहे. त्यामुळे पूर्वेकडील चंदगडी बोलीवर कानडी आणि बेळगावी मराठीचा प्रभाव दिसतो तर पश्चिमेकडील बोलीवर गोमंतकीय कोकणीचा प्रभाव दिसतो. चंदगडी माणूस हा निर्मळ, स्वाभिमानी आणि सडेतोड स्वभावाचा असल्यामुळे स्वाभाविकच त्याची भाषा ही राकट आहे. या भाषेत लिंगभेद आढळत नाही. प्रत्येक विधी, सण, उत्सव यांचे लोकगीतांतून मोठे साजरीकरण होते. जर ही बोलीभाषा टिकवावयाची तर तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहेत.

डॉ. एकनाथ आळवेकर 'कोल्हापुरी बोली" या विषयावर बोलताना म्हणाले, कोल्हापुरी बोली ही कृषी आणि ग्रामीण संस्कृतीमधून उदयाला आलेली आहे. करवीर, पन्हाळा, कागल, भुदरगड, शाहूवाडी, शिरोळ आणि गगनबावडा व कर्नाटकचा सीमाभाग या ठिकाणी प्रामुख्याने ती बोलली जाते. इथला भूमीपुत्र रांगडा आहे. त्याच्या स्वभावाचे प्रतिबिंब त्याच्या बोलीमध्ये आढळते.

■ **कोल्हापुरी, चंदगडीस विविध बोलीभाषांचे उलगडले विविध पैलू**

### चंदगडी लोककलाकारांचे श्रवणीय सादरीकरण

कार्यक्रमात डॉ. गोपाळ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली नागनवाडी येथील तुळसाबाई बांदिवडेकर आणि सहकारी लोककलाकारांनी चंदगडी लोकगीतांचे सादरीकरण केले. यामध्ये सरिता विष्णू गावडे, सुनिता गोविंद भादवणकर, गुंडाबाई बाळू गावडे, शांता महादेव बांदिवडेकर, अनिता अनंत गावडे, सुनिता गावडे आणि शांता दत्तू गावडे यांचा समावेश होता.

डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. प्रांजल क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अजित पोवार, मुकुंद गोरे, अधीक्षक नारायण जायभाये, नितीन यशवंतराव, डॉ. अनिल गवळी, डॉ. अरुण शिंदे, डॉ. श्यामसुंदर मिरजकर उपस्थित होते.